LIB 013

**ग्रंथालय आणि माहितीशास्त्र : घटना, घडामोडी, भाष्य**

**संपादक**
**संचालक**
मानव्यविद्या आणि सामाजिकशास्त्रे विद्याशाखा

**कार्यकारी संपादक**
**डॉ. प्रकाश बर्वे**
प्रमुख,ज्ञान स्रोत केंद्र

संपादक मंडळ

श्री. नारायण बारसे, ठाणे
डॉ. जगदीश कुलकर्णी, नांदेड
डॉ. शालिनी लिहितकर, नागपूर
डॉ. सिद्धी जगदाळे, मुंबई
डॉ. सारिका सावंत, मुंबई
डॉ. जयंत नंदागवळी, नाशिक

©२०२४

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

**निर्मिती**
श्री. विलास बधान, प्रमुख (प्र.),
ग्रंथनिर्मिती केंद्र,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

**मुद्रक व प्रकाशक**
श्री.दिलीप भरड कुलसचिव,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक 422 222

**संपादकीय साहित्य पाठविण्यासाठी**

**ई-मेल : editordyangangotri@ycmou.ac.in**

❖ या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संपादक मंडळ व तज्ज्ञ सल्लागार मंडळ सहमत असेलच असे नाही.

**तज्ज्ञ सल्लागार मंडळ**

**डॉ. राजेंद्र कुंभार**
प्राध्यापक, ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे- 411 007

**डॉ. मोहन खेरडे**
संचालक, ज्ञानस्रोत केंद्र
संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती- 444 602

**डॉ. रणजीत धर्मापुरीकर**
निवृत्त माहिती शास्त्रज्ञ
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड- 431 602

**डॉ. अनिल चिकाटे**
संचालक, ज्ञानस्रोत केंद्र
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव – 425 401

**डॉ. सुषमा पौडवाल**
निवृत्त ग्रंथपाल
एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई – 400 049

# ज्ञानगंगोत्री

**वर्ष : २५वे    ज्ञानगंगोत्री : जून ते ऑगस्ट २०२४    अंक : १**

**अनुक्रमणिका**

**ISSN** 2231-6507


- संपादकीय :
- ग्रंथालय आणि माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगातही ग्रंथालय आणि माहितीशास्त्राचे महत्व : रणजित धर्मापुरीकर
- ऑटिझम नेटवर्क जर्नलचे आशय विश्लेषण(2002-2019) : डॉ मेधा मांगूरकर
- नॅक मूल्यांकन आणि ग्रंथालयांची भुमिका : हितेश गोपाळ ब्रिजवासी
- विद्यापीठ ग्रंथालयातील उत्कृष्टतेसाठी सिक्स सिग्मा पद्धत : एक केस स्टडी : डॉ उज्ज्वला उल्हे

## संपादकीय

कोणत्याही शिक्षण व्यवस्थेत आणि संशोधन संस्थांमध्ये ग्रंथालय आणि "माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगातही ग्रंथालय आणि माहितीशास्त्राचे महत्व" या आपल्या लेखात रणजित धर्मापुरीकर यांनी ग्रंथालयांचे महत्त्व विषद केले आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे ज्ञानाचा मोठा समुद्र निर्माण झाला आहे. इंटरनेटच्या माध्यमातून अगणित माहिती उपलब्ध झाली आहे तरीही त्या माहितीची सत्यता, विश्वासार्हता आणि उपयोगिता तपासणे आवश्यक आहे. इथे ग्रंथालय माहितीशास्त्राची भुमिका महत्वाची ठरते हा विचार त्यांनी मांडला आहे. तसेच संशोधनाच्या क्षेत्रातही ग्रंथालय महत्वपूर्ण भूमिका बजावत आहे.

डॉ मेधा मांगूरकर यांनी ऑटिझम नेटवर्क जर्नलचे आशय विश्लेषण(2002-2019) ह्या आपल्या लेखात या नियतकालिकाचा आशय विश्लेषणाच्या दृष्टीकोनातून अभ्यास केला आहे. नियतकालिकाचे महत्व, लेख, विषय, लेखक,उपभोक्ता यांच्यावर विशेष चर्चा केली आहे आणि ऑटिझम संबंधी दर्जेदार माहितीची गरज व्यक्त केली आहे.

हितेश गोपाळ ब्रिजवासी यांनी नॅक मूल्यांकन आणि ग्रंथालयांची भुमिका या लेखात उच्च शिक्षण संस्थेच्या मूल्यांकनासाठी नॅक ही सर्वोच्च समिती असून या समितीच्या मुल्यांकनात ग्रंथालयांना विशेष महत्व दिले गेले आहे आणि मुल्यांकनाच्या श्रेणीमध्ये सुधारणा करायची असेल तर पारंपारिक प्रमाणेच आधुनिक सेवा सुविधांवर भर देणे आवश्यक आहे हा विचार मांडला आहे.



विद्यापीठ ग्रंथालयातील उत्कृष्टतेसाठी सिक्स सिग्मा पद्धत : एक केस स्टडी या लेखात डॉ उज्ज्वला उल्हे यांनी ग्रंथालयात सिक्स सिग्मा या तंत्राचा वापर ग्रंथालय सुधारणांशी निगडीत उद्दिष्टे स्थापित करून, असलेल्या त्रुटी दूर करून, गुणवत्ता साधण्यासाठी वेळेचे नियोजन करण्यासाठी करावा याची चर्चा केली आहे. तसेच या तंत्राचे दोषमुक्त सेवा, वाचकांचे समाधान, उच्च कर्मचारी मनोबल आणि गुणवत्ता वाढ हे फायदे सांगितले आहेत.

# माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगातही ग्रंथालय आणि माहितीशास्त्राचे महत्व.

**रणजित धर्मापुरीकर, नांदेड.**

**प्रस्तावना**

आजच्या आधुनिक युगात म्हणजे माहिती आणि तंत्रज्ञानाच्या सार्वत्रिकीकरणात माहितीची निर्मिती आणि विविध माध्यमांतून त्याचे प्रसारण वेगाने होत आहे. केवळ वर्तमानकालीन/ताजी बातमी अथवा माहिती नाही तर ऐतिहासिक दुर्मिळ महत्त्वपूर्ण दस्तऐवज (पुस्तके,शासन निर्णय, नियतकालिके, अहवाल इ.) चे रुपांतरण डिजीटलायझेशन मध्ये होत आहे. घरबसल्या इंटरनेटवर संगणक, मोबाईल द्वारे अनेक माध्यमांतून माहिती, मनोरंजन, ज्ञान संवर्धन होत आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या या रेट्यात सर्व माहिती, ज्ञान, मनोरंजनाचा उपभोग घेण्यास मनुष्याला वेळ कमी पडत आहे. वेगवेगळी महत्त्वपूर्ण माहिती, ज्ञान अथवा मनोरंजनाच्या संधी वेळेअभावी निसटून जात आहेत. माहिती आणि तंत्रज्ञान जेव्हा अस्तित्वात नव्हते तेंव्हाच 'माहितीचा विस्फोट ' ही संकल्पना १९७० मधे अलव्हीन टॉफ्लरने याच अर्थाने पुढे ठेवली. अलीकडे हीच संकल्पना वेगाने व भरमसाठ वाढत जाणाऱ्या माहितीमुळे 'माहितीचा महापूर ' या अर्थाने वापरली जाते आहे. आपल्याला सर्वांना कल्पना आहे, किती गोष्टी पुरात वाहून जातात आपल्याला समजत नाहीत. माहितीचे असंच काहीस होत आहे. माहिती, ज्ञान, मनोरंजन अवगत करण्याचे मुख्य दोन प्रकार आहेत. एक माहित असलेली, पण आता विस्मरणात गेलेली, पुसटशी स्मरणात असलेली माहिती शोधून ती माहिती नव्याने मिळविणे आणि बिलकुल ज्ञात नसलेली माहिती, ज्ञान अचानक या माहितीच्या महापुरात समोर येणे. दोन्ही प्रकारातील माहिती आपल्याला महत्त्वाची असते. पण दुसऱ्या प्रकारच्या माहितीची निश्चितता नसते त्यामुळे मोठे नुकसान होते.



इथे आपल्याला ग्रंथालय आणि माहितीशास्त्राचे महत्त्व ध्यानात येते. माहिती तंत्रज्ञान युगात ग्रंथालय आणि माहितीशास्त्राचे महत्त्व अपरंपार आहे. संगणक, इंटरनेट आणि डिजिटल तंत्रज्ञानामुळे माहितीच्या संग्रहण, शोध आणि प्रसाराच्या पध्दतीत अमुलाग्र बदल झाला आहे. मात्र, या तंत्रज्ञानाच्या युगातही ग्रंथालय आणि माहितीशास्त्राचे अद्वितीय स्थान आहे.

माहिती तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे ज्ञानाचा एक प्रचंड मोठा समुद्र निर्माण झाला आहे. इंटरनेटच्या माध्यमातून अगणित माहिती उपलब्ध झाली असली तरीही त्यांची सत्यता, विश्वासार्हता, आणि उपयोगिता तपासणे आवश्यक आहे. इथं ग्रंथालय आणि माहितीशास्त्राची भूमिका महत्त्वाची आहे. ग्रंथालय आणि त्यात कार्यरत तज्ञ व्यक्ती ज्या भारतीय ग्रंथालय आणि माहितीशास्त्राचे पितामह डॉ एस आर रंगनाथन यांनी रचलेल्या विषयाच्या भक्कम अधिष्ठानातून तयार झालेले तज्ञ, वाळवंटात ज्ञानाच्या पाणपोई सारखे असतात. डिजिटल तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अनेक ग्रंथालयांनी डिजिटल संसाधने विकसित केली आहेत. इ-बुक्स, इ-जर्नल्स आणि ऑनलाइन डेटाबेसेसच्या माध्यमातून वाचकांना अधिकाधिक माहिती सहज उपलब्ध होत आहे. या डिजिटल ग्रंथालयांनी भौतिक सीमा ओलांडल्या आहेत आणि माहितीच्या प्रसाराला नवीन परिमाण दिले आहे.

माहिती शास्त्राच्या मदतीने ग्रंथालये माहितीचे योग्य व्यवस्थापन करतात. माहितीचे वर्गीकरण, तालिकीकरण, इनडेक्सिंग आणि शोध प्रक्रियेत सुधारणा घडवून आणतात. त्यामुळे वाचकांना हवी ती माहिती जलद आणि सोप्या पद्धतीनं मिळते. तसेच पारंपरिक माहितीच्या सुरक्षेसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जातो.

ग्रंथालये संशोधनाच्या क्षेत्रातही महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. संशोधकांना आवश्यक असणारी माहिती, संदर्भ आणि डेटा उपलब्ध करुन देतात. माहिती शास्त्राच्या मदतीने संशोधनाच्या प्रक्रियेत गती येते आणि नव्या संशोधनाला चालना मिळते.

ग्रंथालये केवळ माहितीचे स्त्रोत नसून समाज आणि संस्कृतीचा एक महत्वपूर्ण भाग आहे. येथे विविध विषयांवरील पुस्तके, दस्तऐवज आणि साहित्य उपलब्ध असते. त्यामुळे समाजातील प्रत्येक घटकाला आपल्या आवडीचा आणि आवशकतेच्या माहितीचा लाभ मिळतो. ग्रंथालये सांस्कृतिक कार्यक्रम, चर्चासत्र आणि कार्यशाळेचे आयोजन करून समाजातील विचारांची देवाण घेवाण घडवून आणतात.

माहिती तंत्रज्ञानाच्या युगातही ग्रंथालय आणि माहिती शास्त्राचे महत्व कमी झालेलं नाही आणि भविष्यातही होणार नाही. उलट या नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून त्यांनी स्वतःला अधिक प्रभावी, सुसंगत आणि आवशक बनवलं आहे. माहितीच्या या महासागरात ज्ञानाच्या शोधत निघालेल्या प्रत्येकाला मार्गदर्शन करण्यासाठी ग्रंथालय आणि माहिती शास्त्राची महत्त्वपूर्ण भूमिका आहे.

ग्रंथालये केवळ माहितीचे स्त्रोत नसून समाज आणि संस्कृतीचा एक महत्वपूर्ण भाग आहे. येथे विविध विषयांवरील पुस्तके, दस्तऐवज आणि साहित्य उपलब्ध असते. त्यामुळे समाजातील प्रत्येक घटकाला आपल्या आवडीचा आणि आवशकतेच्या माहितीचा लाभ मिळतो. ग्रंथालये सांस्कृतिक कार्यक्रम, चर्चासत्र आणि कार्यशाळेचे आयोजन करून समाजातील विचारांची देवाण घेवाण घडवून आणतात.

माहिती तंत्रज्ञानाच्या युगातही ग्रंथालय आणि माहिती शास्त्राचे महत्व कमी झालेलं नाही आणि भविष्यातही होणार नाही. उलट या नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून त्यांनी स्वतःला अधिक प्रभावी, सुसंगत आणि आवशक बनवलं आहे. माहितीच्या या महासागरात ज्ञानाच्या शोधात निघालेल्या प्रत्येकाला मार्गदर्शन

# ऑटिझम नेटवर्क जर्नलचे आशय विश्लेषण

# (२००२ ते २०१९)

**डॉ.मांगूरकर मेधा राजेश**

**सहायक प्राध्यापक, ग्रंथालय आणि माहिती विज्ञान विभाग, एचपीटी कला आणि आरवायके विज्ञान महाविद्यालय, नाशिक**
**medhamangurkar@gmail.com**

**सारांश**

ऑटिझम नेटवर्क जर्नल हे ऍक्शन फॉर ऑटिझम द्वारे प्रकाशित केलेले मुक्त प्रवेश त्रैमासिक जर्नल आहे. वर्तमान काळात २००२ ते २०१९ या कालावधीत प्रकाशित झालेल्या २७२लेखांचे बिबलियोमेट्रिक विश्लेषणाचा अभ्यास केला गेला आहे. या लेखात प्रति अंक प्रकाशित झालेल्या लेखांची संख्या, लेखकत्व नमुना, भौगोलिक वितरण आणि विषय विश्लेषण करण्यात आले आहे .

**प्रस्तावना**

WebMD च्या मते, ऑटिझमला, ऑटिझम स्पेक्ट्रम डिसऑर्डर (ASD) देखील म्हणतात, ही एक गुंतागुंतीची स्थिती

असून संवाद आणि वर्तनातील समस्यांचा समावेश आहे. मूल तीन वर्षाचे होईपर्यंत ऑटिझमची लक्षणे दिसू लागतात. ऑटिझम असलेल्या मुलांना त्यांच्या भावना, शब्द, स्पर्श व्यक्त करण्यात अडचणी येतात. ही मुले संगीत, गणित, स्मृती, आणि कलेत असामान्यपणे चांगली असू शकतात. ASD ही किरकोळ किंवा गंभीर अपंगत्व असू



शकते ज्यासाठी विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. ऑटिझम असलेल्या मुलांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. २०१८ च्या एका अभ्यासाने असे सुचवले आहे की सुमारे दहा वर्षांखालील दहा पैकी एका मुलाला ऑटिझमचा त्रास होतो. ऑटिझम ग्रस्त कुटुंबांना मुलांच्या कल्याणासाठी दर्जेदार माहितीची गरज आहे. Nayar (2016) यांनी एका लेखात (https://www.healthissuesindia.com/) असे निरीक्षण केले की "भारतात मानसिक अपंगत्वाची समस्या आहे ही अजूनही निषिद्ध मानले जाते. पालक आणि व्यावसायिकांनी एकत्र येण्याची नितांत गरज आहे ऑटिझमची आव्हाने हाताळण्याच्या विविध पैलूंवर चर्चा करणे, समजून घेणे. हे सर्व व्यक्तींसाठी आवश्यक आहे लक्षणे, थेरपी, वर्तणुकीशी संबंधित समस्या, शैक्षणिक तरतुदी समजून घेण्यासाठी ऑटिझमशी संबंधित, भारतीय कायद्याद्वारे प्रदान केलेल्या सुविधा इत्यादी. या उद्देशाने, सध्याचा अभ्यास जाणून घेणे आवश्यक आहे,हा अभ्यास म्हणजे "ऑटिझम नेटवर्क" शीर्षक असलेल्या ऑटिझमवरील विनामूल्य, ऑनलाइन जर्नलचे विश्लेषण करण्यात आले आहे.

ऑटिझम नेटवर्क हे नोंदणीकृत, ना-नफा भारतीय संस्थेचे प्रकाशन आहे Action फॉर ऑटिझम (AFA) १९९४ पासून ऑटिझम नेटवर्क जर्नल वर्षातून तीनदा म्हणजे एप्रिल, ऑगस्ट आणि डिसेंबर महिन्यात ऑनलाईन स्वरूपात प्रकाशित होते. हे जर्नल ऑटिझम संबंधित लेख छापते. ऑटिझमग्रस्त मुलांचे पालक आणि व्यावसायिकांना एकत्र आणण्यासाठी आणि शिक्षित करण्यासाठी महत्वाचे कार्य करत आहे. जर्नलमधील लेख हे आरोग्य व्यावसायिक, पालक आणि ऑटिस्टिक मुलांची भावंडे तसेच AFA मध्ये काम करणारे कर्मचारी आणि जगभरातील ऑटिस्टिक मुले यांनी देखील लेख लिहिलेले आहेत.

**व्याप्ती**

सध्याचा अभ्यास ऑनलाइन उपलब्ध असलेल्या एप्रिल २००२ पासून डिसेंबर २०१९ पर्यंत प्रकाशित झालेल्या लेखांचे विशलेशन आहे

**उद्दिष्टे**

- प्रति अंक प्रकाशित झालेल्या लेखांची संख्या जाणून घेणे
- लेखकत्व नमुना शोधणे
- लेखांचे भाषावार विश्लेषण करणे.
- लेखांचे देशानुसार विश्लेषण करणे.
- लेखांच्या विषयांचे विश्लेषण करणे.

**संशोधन कार्यप्रणाली**


एप्रिल २००२ पासून डिसेंबर २०१९ या कालावधीत अठरा खंड (खंड 9 ते खंड 26) ऑनलाईन उपलब्ध आहेत ज्यात 53 अंक आहेत (खंड 21 क्रमांक 3, डिसेंबर 2014 अंक उपलब्ध नाही.

२००२ ते २०१९ या वर्षात उपलब्ध असलेले ऑनलाईन अंक अभ्यासासाठी निवडले व डाउनलोड केले गेले. लेखाचे तपशील जसे की लेखाचे शीर्षक, नाव लेखकाची, एकूण पृष्ठांची संख्या आणि प्रति अंकाचा लेख अभ्यासला गेला आणि त्याचे विश्लेषण केले गेले. घोषणा, पत्रे, अभ्यासाच्या कालावधीत प्रकाशित हेल्पलाइन, कार्यशाळा इत्यादी वगळण्यात आल्या आहेत.

**माहिती विश्लेषण**


आकृती क्रं१ प्रति अंक प्रकाशित झालेले लेख







जर्नल हे त्रैमासिक प्रकाशन आहे. तक्ता क्र. १ वरून असे दिसून येते की लेखांची संख्या कमी होत चालली आहे. सर्वात जास्त लेख २००२ मध्ये प्रकाशित झाले आहेत आणि सर्वात कमी लेख २०१४ मध्ये प्रकाशित झाले आहेत.

आकृती क्रं २ लेखकानुसार नमुना





आकृती क्र. २ वरून असे दिसून येते की जास्तीत जास्त लेख (७५ %) एकाच लेखकाने लिहिलेले आहेत. २५ % योगदान निनावी लेखकांचे आहे.

आकृती क्रं ३ लेखकांचे देशानुसार विश्लेषण




सारणी क्रं ३ ऑटिझम नेटवर्क जर्नलमध्ये योगदान देणारे सर्वात उत्पादक देश दर्शविते. एकूण प्रकाशनांपैकी ६४% योगदाना भारत सर्वात उत्पादक देश आहे आणि निनावी लेखकांचे १९% योगदान आहेत.


आकृती क्रं ४ भाषावार विश्लेषण






आकृती क्रं ४ दर्शविते की बहुतेक लेख (७७.२%) इंग्रजीत आहेत तर २२.८ % लेख हिंदी भाषेत प्रकाशित झाले आहेत. हिंदी भाषेतील लेख एकतर मूळतः हिंदीमध्ये लिहिलेले किंवा इंग्रजी भाषेतून भाषांतरित केलेले.

आकृती क्रं ५ विषयनुसार विश्लेषण




आकृती क्रं ५ ऑटिझम नेटवर्क जर्नलमध्ये प्रकाशित लेखांचे विषयवार विश्लेषण प्रकट करते. बहुतेक लेख ४६.३ % )(माहितीपूर्ण स्वरूपाचे आहेत, त्यानंतर (११.२%) पालकांचे अनुभव आहेत आणि ऑटिस्टिक मुलाचे संगोपन करणे आणि त्यांच्या सामान्य समस्या हाताळणे, यशोगाथा वर्णन करणारे ५.६ % लेख आहेत , ऑटिस्टिक व्यक्तींच्या वर्तनविषयक समस्यांची चर्चा करणारे २.२% लेख आहेत. १.५% लेखांमध्ये ऑटिस्टिक मुलांचा दृष्टीकोन समोर येतो तसेच १.५% लेख बंधू/बहिणीच्या त्यांच्या ऑटिस्टिक भावंडाबद्दलच्या दृष्टिकोनावर चर्चा करत आहेत आणि १.५% लेख ऑटिझम असलेल्या मुलांमध्ये संवाद कौशल्य विकसित करण्याबद्दल बोलतात.

**चर्चा:**

जर्नल वर्षातून तीनदा प्रकाशित होते. लेखकत्वाची पद्धत बरीच विविधता दर्शवते उदा. एकल लेखक, सहकार्याने लेखन करणारे लेखक, लेखक म्हणून संस्था आणि निनावी लेखक. बहुसंख्य लेखक एकल आहेत. लेखकांच्या प्रोफाइलवरून असे दिसून येते की जर्नलमध्ये राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पार्श्वभूमी असलेले लेख लिहिले आहेत. त्यात शिक्षक, जर्नलचे संपादक, विषय तज्ञ, थेरपिस्ट, कार्यकर्ते, वास्तविक जीवनातील अनुभव सामायिक करणारे मुलांचे पालक आणि अनुवादक आहेत . लेखकांच्या विश्लेषणातून असे दिसून येते की भारताने सर्वात जास्त लेखांचे योगदान दिले आहे, आंतरराष्ट्रीय लेखकांचे योगदान ५६ आहे. तर ५१ लेख अज्ञात लेखकांनी लिहिलेले आहेत. जर्नलने इंग्रजी तसेच हिंदी भाषेत लेख छापून वाचकांची संख्या वाढवली आहे . जर्नलमधील लेखांच्या विषयांची व्याप्ती वाढवली आहे उदा. पालकांचे ऑटिस्टिक मुलाचे संगोपन, वर्तणुकीशी संबंधित समस्या हाताळण्याचे कौशल्य , वास्तविक जीवन अनुभव, संप्रेषण कौशल्ये, थेरपी आणि यशोगाथा विकसित करणे.

**निष्कर्ष:**

या जर्नलने अभ्यासाच्या कालावधीत २७२ लेख प्रकाशित केले आहेत. मध्ये जास्तीत जास्त दहा लेख प्रकाशित झाले ऑगस्ट 2002. प्रति अंक सरासरी पाच लेख प्रकाशित केले जातात. लेखकत्व नमुना ते दर्शवितो या जर्नलमधील योगदानकर्त्यांद्वारे एकल लेखकत्व (७५% ) प्राधान्य दिले जाते आणि एकावन्न योगदाने आहेत (19%) अज्ञात लेखकांद्वारे प्रकाशित झाले आहेत . सध्याच्या अभ्यासातून अभ्यासात असे दिसून आले आहे की बहुतेक लेख इंग्रजी भाषेत प्रकाशित केले जातात. हिंदी भाषेतील लेख एकतर मूळ लेख असतात किंवा इंग्रजीतून हिंदीत अनुवादित केले जातात. लेखक इतर भारतीय प्रादेशिक भाषा देखील या जर्नलमध्ये समाविष्ट केल्या पाहिजेत अशी शिफारस करतो. विषयांवर चर्चा केली या जर्नलमध्ये प्रामुख्याने माहितीपूर्ण स्वरूप आहे. हे जर्नल ऑटिझमच्या क्षेत्रात पालक आणि व्यावसायिकांसाठी खूप उपयुक्त आहे.

REFERENCES:



Jena K.L. (2006). A bibliometric analysis of the journal 'Indian Journal of Fibre and Textile Research, 1996 – 2004. Annals of Library and Information Studies, 53, 22-30

Kundu, Dinesh Kumari and Swain, Nirmal Kumar. (2021) "A Scientometric Study of Journal of
Librarianship & Information Science (JoliS) During 2007-2016". Library Philosophy and Practice (e journal). 6688.

Nayak, Satyajit, Hari, Piyush Kumar; and Verma, Neha. (2021). "Research Trends in Annals of Library and Information Studies (ALIS): A Bibliometric Review from 2011-2021”. Library Philosophy and Practice (e-journal). 6584. Available from: URL: https://digitalcommons.unl.edu/libphilprac/6584

Nayar (2016). Autism in India. Why we need awareness. https://healthissuesindia.com/

Verma N., Tamrakar R., & Sharma P. (2007). Analysis of contributions in 'Annals of Library and
Information Studies'. Annals of Library and Information Studies, 54, 106-111

Available from: URL: https://digitalcommons.unl.edu/libphilprac/6688

https://www.autism-india.org

www.rehabcouncil.nic.in

https://www.healthissuesindia.com/2020/04/02/autism-in-india-why-we-need-awareness

# विद्यापीठ ग्रंथालयातील उत्कृष्टतेसाठी सिक्स सिग्मा पद्धतः एक केस स्टडी


- **डॉ. उज्वला सुधीर उल्हे**
- **ग्रंथपाल**
- **संदिप विद्यापीठ, नाशिक**


- "ग्रंथपाल हे नेहमीच विचारशील आणि मदत करणारे लोक असतात. ते वर्ग नसलेले शिक्षक असतात. ग्रंथालये नाहीत, प्रगती नाही." -विलार्ड स्कॉट
-
- **सारांश -**

- १९ व्या शतकातील सिक्स सिग्मा हे एक महत्वाचे तंत्र आहे, या तंत्र पद्धतीचा वापर केवळ उत्पादन कंपनी आणि उत्पादनांमध्ये केला जात होता, परंतु आता २१ व्या शतकात, सिक्स सिग्मा पद्धत सेवा क्षेत्रात सुद्धा खूप उपयुक्त आहे हे सिद्ध झाले आहे, जसे की, रुग्णालय, ग्रंथालये, विविध संस्था, महाविद्यालये, विभाग, बँका, पोस्ट. हे त्रुटी मुक्त तंत्र आहे. ग्रंथालयांमध्ये हे तंत्र दैनंदिन ग्रंथालय सेवांमध्ये अतिशय उपयुक्त आहे, जसे की अभिसरण, संपादन. परिसंचरण विभाग. ग्रंथालयीन सेवांशी उपयोजक किंवा वापरकर्त्याचा थेट संबंध असून त्यावरून वापरकर्त्यांच्या समाधानाची पातळी काढता येते. पारंपारिक ग्रंथालयांमध्ये ग्रंथालयातील व्यक्ती आणि वापरकर्त्यांसाठी जलद सेवा देणे खूप कठीण होते. वापरकर्ते ग्रंथालय सेवांबद्दल समाधानी नव्हते. सर्वांना जलद सेवा मिळणे अपेक्षित आहे आणि होते. हे कोणत्याही दर्जेदार तंत्रानेच शक्य आहे. तुमच्या वापरकर्त्यांच्या समाधानासाठी सिक्स सिग्मा हे सर्वोत्तम तंत्र आहे. हा एक केस स्टडी आहे, यातून येणारा अहवाल सर्व ग्रंथालयासाठी पात्र आहेत. या लेखा मध्ये, सिक्स सिग्मा म्हणजे काय, त्यांचे फायदे, DMAIC प्रक्रिया, भूमिका आणि जबाबदारी समाविष्ट केले आहे. हा एक संशोधन आधार अभ्यास आहे.


- **कीवर्ड** - सिक्स सिग्मा, ग्रंथालय वापरकर्ते, वापरकर्त्यांचे समाधान, 6σ प्रक्रिया.

- परिचय -
- **सिक्स सिग्मा (6σ) म्हणजे काय?**
- सिग्मा हे ग्रीक अक्षर आहे जे सांख्यिकीमधील मानक विचलनाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी वापरले जाते आणि कोणत्याही घटकाच्या कमी गुणवत्तेतील सहा मानक विचलनांसाठी सिक्स सिग्मा हे तंत्र वापरले जाते. सिग्मा (6σ) हे वस्तुंच्या दिलेल्या संख्येमध्ये परिवर्तनशीलतेचे प्रमाणित सांख्यिकीय माप होय. विशेषत: ते प्रमाण विचलन आणि संख्येच्या सरासरीमधील अंतर आहे. हे मोटोरोलाने त्याच्या उत्पादन विभागात सुरू केले होते जेथे लाखो भाग एकाच प्रक्रियेचा वापर करून वारंवार बनवले जातात. अखेरीस 6σ विकसित होतात आणि इतर गैर-उत्पादन प्रक्रियांवर लागू होतात. आज, सेवा, वैद्यकीय आणि विमा प्रक्रिया, कॉल सेंटर आणि मुख्यतः ग्रंथालय व्यवस्थापन यासारख्या अनेक क्षेत्रांमध्ये कोणीही 6σ लागू करू शकतो.
- **प्रमाणित विचलन: -**
- प्रक्रियेच्या बाह्य स्वरूपात मिळणारी परिवर्तनशीलता एका आकडेवारीद्वारे मोजली जाते ज्याला प्रमाण विचलन म्हणतात.
- **6σ चा इतिहास: -**
- 'सिक्स सिग्मा' हा शब्द सांख्यिकी क्षेत्रातून आला आहे. प्रमाण मानक म्हणून त्याची उत्पत्ती कार्ल फ्रेडरिक गॉस (१७७७-१८५५) यांनी शोधून काढली आहे. ज्याने सामान्य वक्र संकल्पना सादर केली. उत्पादन भिन्नतेमध्ये प्रमाण मानक म्हणून सिक्स सिग्मा, १९२० च्या दशकात शोधले गेले आहे. मोटोरोला कंपनी मध्ये अभियंता असलेले बिल स्मिथ यांनी कंपनीच्या दर्जेदार मिळणाऱ्या उत्पादन

आणि सेवा या गोष्टींसाठी प्रयत्न केले आणि या तंत्राचा वापर करून सर्वोत्तम उत्पादन देणाऱ्या कंपनीमध्ये त्या कंपनीला उच्चस्थानावर आणले.

- **6σ का? -**
- सिक्स सिग्मा तंत्राचा दृष्टीकोन समोर ठेवला, तर बजेटच्या गरजा आणि वापरकर्त्याचे समाधान यांच्यात समतोल साधला जाऊ शकतो आणि माहिती व्यवसायाला संस्थेच्या व्यावसायिक उद्दिष्टांशी जोडू शकतो. वापरकर्त्याच्या समाधानासाठी सिक्स सिग्मा हे सर्वात प्रभावी साधन मानले जाते. जे की प्रत्येक सेवा क्षेत्रामध्ये अपेक्षित आहे.
- सिक्स सिग्मा पद्धती ही अशी पद्धती आहे की, प्रत्येक प्रक्रियेचे सतत पुनरावलोकन करून, त्यात सुधारणा करून पाहिजे असलेले उद्दिष्ट गाठण्यासाठी यातील प्रत्येक प्रक्रिया पुन्हा पुन्हा करून त्याच्या प्रत्येक गोष्टीत हवे असलेले बदल करून ही प्रक्रिया सुधारली जाते. सिक्स सिग्मा 'DMAIC' म्हणून ओळखली जाणारी पद्धत वापरते. DMAIC म्हणजे संधी परिभाषित करणे, प्रमुख कामगिरी करणे, संधीचे विश्लेषण करणे, कार्यप्रदर्शन सुधारणे आणि कार्यप्रदर्शन नियंत्रित करणे. 'DFSS' तत्त्वांचा वापर करून अगदी नवीन व्यवसाय प्रक्रिया तयार करण्यासाठी सिक्स सिग्मा पद्धतीचा वापर केला जाऊ शकतो. म्हणजे सिक्स सिग्मासाठी डिझाइन तयार करणे आणि त्याच्या परिपूर्णतेसाठी सिक्स सिग्मा पद्धतीचा वापर करणे. प्रत्येक उत्पादन किंवा सेवा व्यवहारासाठी सुद्धा प्रति दशलक्ष मध्ये 3.4 दोषांसाठी या तंत्राचा वापर करून त्यातील सर्व दोष काढून टाकले जाते. सर्व दोष कमी करण्यासाठी आणि गुणवत्तेचे मोजमाप करण्यासाठी ही पद्धत सांख्यिकीय तंत्रावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असते. यात व्यवसाय, सांख्यिकी आणि अभियांत्रिकीमध्ये वापरले जाणाऱ्या मूलभूत तत्त्वे आणि तंत्रांचा समावेश आहे. हे तीन सिक्स सिग्माचे मुख्य घटक बनवतात. जे की प्रक्रियेचे कार्यप्रदर्शन सुधारते, भिन्नता कमी करते आणि प्रक्रियेच्या उत्पादनाची सातत्यपूर्ण



गुणवत्ता राखते. यामुळे उत्पादनाच्या गुणवत्तेत दोष कमी करणे आणि त्यात अधिक सुधारणा करून ग्राहकांचे समाधान कसे वाढवायचे हे यातून साध्य होते.

- **6σ प्रक्रियेच्या सहा पायऱ्या: -**
- पायरी १. - तुम्ही करत असलेले काम ओळखा.
- पायरी २. - अंतर्गत आणि बाह्य दोन्ही वाचकांशी संवाद वाढवा.
- पायरी ३. - तुम्हाला तुमचे काम करण्यासाठी नेमके काय हवे आहे ते ओळखा.
- चरण ४. - प्रक्रियेची प्रतिकृती तयार करा.
- पायरी ५. - प्रक्रिये मध्ये असलेल्या त्रुटी दूर करा.
- पायरी ६ - गुणवत्ता साधण्यासाठी वेळेचे नियोजन करून त्याचे मोजमाप करणे, त्यानुसार उद्दिष्टे स्थापित करून असलेल्या त्रुटी दूर करून सुधारणा करणे.
- **6σ चे फायदे: -**
- - दोषमुक्त उत्पादन किंवा सेवा.
- - ग्राहकांचे अधिकाधीक समाधान.
- - उच्च कर्मचारी मनोबल.
- - गुणवत्ता वाढीवर भर देणे. (म्हणजे गुणवत्ता जीवनाचा एक मार्ग बनते.)
- ही पद्धत अनेक व्यवसाय प्रक्रिया व्यवस्थापन उपक्रमांमध्ये देखील वापरली जाते आणि ती उत्पादन क्षेत्राशी संबंधित नसते. आजच्या जगात सिक्स सिग्मा वापरणाऱ्या अनेक BPM (व्यवसाय प्रक्रिया व्यवस्थापन) मध्ये कॉल सेंटर्स, ग्राहक समर्थन, पुरवठा साखळी व्यवस्थापन आणि प्रकल्प व्यवस्थापन यांचा समावेश होतो.
- **6σ च्या प्रमुख संकल्पना: -**
- सिक्स सिग्मा काही प्रमुख संकल्पनांभोवती फिरते.
- • गुणवत्तेसाठी आग्रही असणे आणि वाचकांना सर्वात महत्त्वाचे स्थान देणे.
- • दोष: वाचकांना जे हवे आहे ते वितरित करण्यात अयशस्वी होणे.

- • प्रक्रिया क्षमता: तुमची प्रक्रिया अधिक चांगल्या प्रकारे काम कसे करू शकते.
- • भिन्नता: वाचकांचा दृष्टीकोन आणि अनुभव यातील फरक.
- • वाचकांचे समाधान सुधारण्यासाठी सातत्यपूर्ण, अंदाज करण्या योग्य प्रक्रिया सुनिश्चित करणे.
- • सिक्स सिग्मासाठी आरेखन: ग्राहकांच्या गरजा आणि प्रक्रिया क्षमता पूर्ण करण्यासाठी आखणी करणे.
- **6σ चे मुख्य घटक -**
- वाचकांच्या गरजा, त्यासाठी लागणारी गुणवत्ता, मॅट्रिक्स आणि प्रक्रियेतील कर्मचाऱ्यांचा सहभाग आणि सतत सुधारणा हे सिक्स सिग्मा प्रक्रियेतील सुधारणांचे मुख्य घटक आहेत. सिक्स सिग्माचे तीन प्रमुख घटक आहेत -
- 1.वाचकांचे समाधान.
- 2. प्रक्रिया समजून घेणे आणि त्यासाठी परिभाषित करणे आणि मेट्रिक्स आणि मेजरची व्याख्या करणे.
- 3. संघ बांधणी आणि कर्मचाऱ्यांचा समावेश.
- सिक्स सिग्मासाठी सर्व कर्मचाऱ्यांचा समावेश असणे खूप महत्वाचे आहे. सर्व कर्मचाऱ्यांचा सहभाग वाढविणे, कर्मचाऱ्यांना कामाबद्दल प्रेरित करणे आणि वाचकांचे समाधान करण्याची क्षमता यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी संधी तयार करणे आवश्यक आहे.
- **6σ चे फायदे: -**
- - पुन्हा पुन्हा तेच काम करण्यासाठी येणाऱ्या खर्चावर नियंत्रण
- - दैनंदिन कार्यातील अकार्यक्षमता.
- - असमाधानी वाचक
- **उद्दिष्ट: -**



- सिक्स सिग्माचा एकंदर उद्देश ग्राहकांना त्याच्या दर्जेदार सेवांद्वारे संतुष्ट करणे हा आहे.
- • गुणवत्तापूर्ण सेवांद्वारे वाचकांचे समाधान निश्चित करणे.
- • ग्रंथालयातील प्रत्येक गोष्टींचा वापर निश्चित करणे.
- • वापरकर्त्यांच्या समाधानाची पातळी निश्चित करणे.
- **संशोधन कार्यप्रणाली: -**

| **अनु क्र** | **प्रकार** | **संशोधन पद्धती** |
|---|---|---|
| १ | संशोधन प्रकार | वर्णनात्मक |
| २ | संशोधन डिझाइन | अन्वेषण |
| ३ | नमुना | यादृच्छिक |
| ४ | एकूण वाचक | १२०० वापरकर्ते |
| ५ | नमुना निवड | ५५० वापरकर्ते |

- **साहित्य समीक्षा –**
- अँटनी, जिजू आणि इतर (२००७), सेवा संस्थांमध्ये सिक्स सिग्मा: फायदे, आव्हाने आणि अडचणी, याविषयी असलेले सामान्य समज, अनुभवजन्य निरीक्षणे आणि त्यातील महत्वाचे घटक यात नमूद केले आहे. या पेपर मध्ये काही सामान्य आव्हाने, अडचणी, सामान्य समज आणि सेवा उद्योग या मध्ये सिक्स सिग्मा लागू करताना येणाऱ्या समस्या स्पष्ट केल्या आहेत. या पुस्तकातील अभ्यासाचे परिणाम दर्शवितात की यूकेमधील बहुसंख्य सेवा संस्था केवळ तीन

वर्षांपासून सिक्स सिग्मा उपक्रमात गुंतलेल्या आहेत. क्षेत्रांची सरासरी सिग्मा पातळी 2.8 सिग्मा पातळी (अंदाजे 98,000 DPMO) आहे. व्यवस्थापन बांधिलकी, ग्राहकांचा सहभाग, व्यवसाय धोरण, संस्थात्मक पायाभूत सुविधा, प्रकल्प व्यवस्थापन कौशल्ये आणि सिक्स सिग्मा पद्धतीचे आकलन हे यशस्वी परिचय, विकास आणि विकासासाठी सर्वात महत्त्वाचे घटक आहेत.

- गिटलो, हॉवर्ड एस., (२००९), लीन सिक्स सिग्मा व्यवस्थापन कौशल्ये अवांछित कचऱ्याचे कारण समजण्यास मदत करतात, प्रत्येकाच्या काम करण्याच्या स्वरूपात असलेला फरक या गोष्टींवर यात भर दिलेला आहे. लेखक सेवेतील LSS अनुप्रयोगांसाठी अनेक उदाहरणे सादर केले आहे जसे उत्पादन क्षेत्र. पुस्तक पाच प्रकरणांमध्ये विभागलेले आहे. पहिला अध्याय म्हणजे कामाचा उद्देश. दुसरा अध्याय प्रेरणा आहे, तिसरा अध्याय म्हणजे कामाची परिस्थिती. चौथा अध्याय म्हणजे वर्तन आणि प्रत्येकाचे परस्परांशी असलेले संबंध, पाचवा अध्याय समारोपावर आहे. हे पुस्तक एक उत्कृष्ट स्त्रोत आहे. हे चांगले संदर्भित आहे, वाचण्यास सोपे आहे.
- **तक्ता १. विद्यमान भौतिक सुविधा वापरकर्त्यांचे समाधान -**

| **क्र.** | **क्रिया** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| १ | वाचन कक्षात पुरेशा खुर्च्या आणि टेबल | ४०%(२२०) |
| २ | वीज आणि प्रकाश | २०%(११०) |
| ३ | पिण्याचे पाणी | २८%(१५४) |
| ४ | सुरक्षा | ७%( ३८.५) |
| ५ | शौचालय सुविधा | ५%( २७.५) |
| ६ | एकूण | १00% |



- एकूण नियमित वापरकर्ते ५५० आहेत. वाचन कक्षा संदर्भात ४० % उपयोजकांनी खुर्च्या आणि टेबल संदर्भात समस्या मांडल्या. विद्यापीठात शौचालय आणि पिण्याच्या पाण्याशी संबंधित समस्या आहेत पण त्या फार कमी आहेत. वीज आणि प्रकाश तसेच आवाजाचा त्रास ही विद्यापीठातील समस्या आहे. परंतु त्यावर उपाय काढले आहे, त्यासाठी प्रत्येक महाविद्यालयाच्या उपयोजकांसाठी बसण्याची वेगळी व्यवस्था करण्यात आलेली आहे. काही नियम कडक करण्यात आले त्यामुळे या गोष्टीवर तोडगा काढण्यात आला आहे. सुरक्षेसंदर्भात असलेल्या अडचणीवर मात करण्यासाठी सुरक्षा रक्षकांची व्यवस्था करण्यात आलेली आहे.
- **तक्ता २. कर्मचाऱ्यांची पात्रता**

| **क्र.** | **क्रिया** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| १ | पीएच.डी | २%(११) |
| २ | पदव्युत्तर पदवी | ४८%(२६४) |
| ३ | बॅचलर डिग्री | ३२%(१७६) |
| ४ | अंडर ग्रॅज्युएट | १५%(८२.५) |
| ५ | इतर | ३%(१६.५) |

| | | |
|---|---|---|
| ६ | एकूण | १00% |

- 
- या ग्रंथालयात २% कर्मचारी पीएच. डी पूर्ण करीत आहेत.  पदव्युत्तर पदवी 48% कर्मचाऱ्यांनी पूर्ण केलेली आहे.  ३२% कर्मचाऱ्यांनी बी.लिब डिग्री पूर्ण केली आहे आणि ते पदव्युत्तर पदवी घेत आहेत. १५% पदवीधर आहेत आणि शिपाई १२वी उत्तीर्ण आहेत.
- **तक्ता ३. ग्रंथालय सेवांची उपलब्धता** –

| क्र. | क्रिया | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | माहिती सेवा प्रदान करणे | ३४%(१८७) |
| २ | संदर्भ सेवा असणे | १५%(८२.५) |
| ३ | ऑनलाइन माहितीमध्ये प्रवेश असणे | २८%(१५४) |
| ४ | इंटरनेट सेवा असणे (वायफाय) | २०%(११०) |
| ५ | सादर केले लायब्ररी ऑटोमेशन | ३%(१६.५) |
| ६ | एकूण | १00% |

- 
- सर्व वापरकर्ते यांना ग्रंथालयाचे नियम आणि कायदे सांगितले व त्यांनी त्यांच्या अभ्यासाच्या वेळी समजून घेतले आहेत. जेव्हा त्यांना माहितीची आवश्यकता असते तेव्हा ते वेबसाइटवरील ग्रंथपाल हा पर्याय वापरतात. ग्रंथालयाद्वारे प्रदान केलेल्या आवश्यक माहितीपूर्ण संदर्भ सेवा दिल्या जातात. ऑनलाइन दस्तऐवज वितरण सेवा देखील प्रदान केल्या जातात. इंटरनेट सेवा म्हणजे वायफाय सेवाही विद्यार्थ्यांना दिली जाते. ग्रंथालयाच्या वाचन कक्षात वायफाय सेवा आहे. ई लायब्ररीमध्ये डीस्पेस डिजिटल रिपॉझिटरी देखील उपलब्ध आहे. ग्रंथालय पूर्णपणे स्वयंचलित आहे. कोहा सॉफ्टवेअर अभिसरणासाठी वापरले जाते.



- **तक्ता ४. खरेदी केलेले नियतकालिक /डेटाबेस/आज्ञावली** –

| क्र. | क्रिया | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | सदस्यत्व घेतलेले जर्नल्स | १०%(५५) |
| २ | सदस्यत्व घेतलेले डेटाबेस | ४%(२२) |
| ३ | कन्सोर्टिया / आंतरग्रंथालयीन सेवा | ३२% (१७६) |
| ४ | ई-लायब्ररी | २०%(११०) |
| ५ | KOHA सॉफ्टवेअर (स्वयंचलित) | ३४%(१८७) |
| ६ | एकूण | १00% |

- 
- एकूण ५०० नियतकालिक घेतले जातात आणि डेटाबेसेसचे सदस्यत्व घेतले आहे. विद्यापीठातील आंतरग्रंथालयीन सेवा अंतर्गत ४% विभिन्न ग्रंथालये एकमेकांशी अंतर्गत जोडलेली आहेत. एकूण प्रतिसाद ३२% आहेत. ई नियतकालीत देखील उपलब्ध आहे आणि Dspace डिजिटल भांडार देखील उपलब्ध आहे. अभिसरण प्रक्रियेत KOHA सॉफ्टवेअर वापरले जाते. या प्रक्रियेत वाचनालयातील कर्मचाऱ्यांसह वापरकर्त्यांचाही वेळ वाचतो. त्यात डॉ. रंगनाथन यांचा चौथा कायदा पूर्ण होतो आणि उद्देश पण सफल होण्यास मदत होते.

- **ग्रंथालयाच्या संकल्पना आणि ग्रंथालयामध्ये ६σ कसे वापरावे** -
- ग्रंथालय म्हणजे पुस्तकांचा संग्रह आहे जो एखादी व्यक्ती आपल्या ज्ञान आणि माहितीच्या प्रगतीसाठी वाचू शकते. वरील उद्देशांच्या पूर्ततेसाठी सुरुवातीला ग्रंथालयाने व्यक्तीच्या गृह ग्रंथालयाचे स्वरूप घेतले. आजूबाजूचे शेजारी, मित्र आणि इतर व्यक्ती पुस्तके वाचण्यासाठी आणि घरच्या ग्रंथालयात परत जाण्यासाठी जाऊ शकतात. त्यामुळे मोठ्या गावांमध्ये आणि शहरांमध्ये सार्वजनिक ग्रंथालयांची कल्पना अस्तित्वात आली. मुख्यतः चॅरिटेबल ट्रस्ट किंवा नगरपालिका संस्थेद्वारे नागरिकांच्या वाचनाची सोय करून देत होते. शाळा, महाविद्यालये, रुग्णालये, वैज्ञानिक संस्था, सरकारी संस्था आणि दूतावास यांनीही हाच विचार मांडला. उदा. बॉम्बे एशियाटिक लायब्ररी, कलकत्ता येथील नॅशनल लायब्ररी, नॅशनल अचीव्ह, म्युझियम इ.
- भारतीय ग्रंथालय चळवळीचे जनक डॉ. एस. के. रंगनाथन यांच्या हस्ते ग्रंथालय व्यवस्थापनाला नवे वळण मिळाले. लायब्ररी व्यवस्थापनात क्रांती घडवून आणली. ग्रंथालयाच्या वैज्ञानिक व्यवस्थापनाच्या नवीन पद्धतींचा परिचय करून दिला. ज्यामध्ये आवश्यक पुस्तके आणि वाचन साहित्य खरेदीचे नियोजन करणे आणि त्यांना सहज आणि जलदपणे हाताळता यावे म्हणून कल्पनारम्य पद्धतीने स्टॉक करणे समाविष्ट होते.
- ही पद्धत देशातील अनेक ग्रंथालयांनी अवलंबली असली तरी, काळाच्या ओघात आणि आधुनिक गरजा आणि ग्रंथालय व्यवस्थापनातील विकासाच्या अनुषंगाने अधिकाधिक गुंतागुंतीच्या परिस्थितीत नवीन समस्या व अडचणी वाचनालयाच्या कामकाजात जाणवू लागल्या. महत्त्वाचे म्हणूनच, ग्रंथालयाचे व्यवस्थापन सुलभ आणि अधिक कार्यक्षमतेने करण्यासाठी, ते विकसित करण्याची आवश्यकता आहे. येथे, सिक्स सिग्माची तत्त्वे अनेक पायावर व्यावहारिक हेतूंसाठी फायदेशीर आणि उपयुक्त आहे असे आढळून आले आहे.




- सिक्स सिग्मा पद्धतीमध्ये साधारणपणे पाच टप्पे असतात. परिभाषित करा, मोजा, विश्लेषण करा, सुधारणा करा, नियंत्रण-(DMAIC).
- **१. व्याख्या** - आर्थिक संसाधने किती प्रमाणात उपलब्ध आहे, त्यासाठी एक पातळी निश्चित करायची आहे आणि ग्रंथालयाच्या वाढीसाठी बेंचमार्क सेट करायचा आहे किंवा विद्यमान ग्रंथालय किती प्रमाणात आहे हे शोधून काढायचे आहे. वरीलप्रमाणे आणि ग्राहकाची आवश्यकता, ग्राहक बांधिलकी आणि प्रक्रिया प्रवाहाचा नकाशा निश्चित करण्यासाठी या पद्धतीचा वापर करण्यासाठी सिक्स सिग्मा पद्धत रुजवणे.
- **२. मापन** - हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी, ग्रंथालय व्यवस्थापनाच्या विद्यमान प्रणालीतील दोष शोधणे आवश्यक आहे. शिवाय, जर काही दोष नसतील किंवा कोणतेही दोष असतील तर, विद्यमान प्रणालीमध्ये चांगले परिणाम आणि परिणामांसाठी सुधारणा करणे हे उद्दिष्ट आहे. प्रथम दोष दूर करून आणि अधिक चांगल्या आणि अधिक प्रभावी पद्धतींद्वारे त्यांचे निराकरण करून आणि ग्रंथालयाच्या व्यवस्थापनासाठी नवीन, व्यावहारिक आणि प्रभावी पद्धती सादर करणे.
- **३. विश्लेषण**-विविध स्त्रोतांकडून ग्रंथालयाच्या उपलब्ध असलेल्या माहितीचे विश्लेषण करणे, दोष, कमतरता आणि समोर आलेल्या चांगल्या गोष्टींचा वापर करून त्याची सारणी करणे आणि त्यांची पडताळणी करणे, ग्रंथालयाच्या विकासासाठी आणि चांगल्या वापरासाठी आणि अंमलबजावणी करण्यासाठी निष्कर्षापर्यंत पोहोचण्यासाठी माहितीची चाचणी करणे.
- **४. सुधारणा करा** - विद्यमान ग्रंथालय व्यवस्था आणि व्यवस्थापन सुधारण्यासाठी नवीन मार्ग आणि शिष्टाचार शोधून काढून. ज्यांना त्यांची गरज आहे त्यांच्यासाठी सुलभ, कार्यक्षम, जलद सेवा पुरवण्यासाठी जास्तीत जास्त

शक्य मर्यादेपर्यंत आदर्श बनवणे आणि जे ग्रंथालय सिक्स सिग्मा व्यवस्थापित करतात त्यांच्यासाठी ही अभिमानाची बाब असेल.

- **५. नियंत्रण** - सुधारणा झालेल्या गोष्टींचे निरीक्षण करणे, सुधारणा सांख्यिकीय मोजणे, मूल्यांकन, परिणामकारकता आणि आवश्यक समायोजन करणे. कोणत्याही क्षेत्रात आणि त्याहूनही अधिक ग्रंथालय व्यवस्थापनात सुधारणा ही एक सतत होत असणारी प्रक्रिया आहे ज्यासाठी आधीच केलेल्या सुधारणा आणि भविष्यात करावयाच्या सुधारणांचे मोजमाप करून प्रगतीचे निरीक्षण करणे आवश्यक आहे. परिणामकारकतेचे मूल्यांकन करण्यासाठी आणि आवश्यक समायोजन करण्यासाठी सांख्यिकीय पद्धती वापरून विकास आणि सुधारित परिणाम होते.

- मूळ
- कारण ओळखा
- --------------------------------------------------------------------------------------------
--------------------
- सुधारात्मक कृती
- ओळखा &
- अंमलबजावणी
- ------------------------------------------------ ----------------------------
--------------------




- **अभ्यासाचे निरीक्षण आणि महत्त्व: -**
- ही प्रणाली प्राध्यापक, विद्यार्थी आणि इतर संशोधकांच्या फायद्यासाठी आहे. समाधानकारक, वेळेवर आणि तत्पर सेवा देण्यासाठी ग्रंथालय व्यवस्थापन, देखरेख आणि प्रगती साधण्यात सध्याची परिस्थिती आणि त्यात येणाऱ्या अडचणी आणि समस्यांचा अभ्यास करते. नंतर ग्रंथालयाच्या वापरादरम्यान



उद्भवणाऱ्या समस्यांमुळे वरील ग्रंथालय सेवा प्रदान करण्याच्या सुधारणेचा विचार केला जातो. जेव्हा समस्या आणि अडचणींचे निराकरण स्पष्ट होते, तेव्हा सुधारणेचे सतत विचार दिसतात. हे उपाय आणि सुधारणा स्थिर आणि पद्धतशीरपणे लागू आणि अंमलात आणल्या गेल्या की विकास होतो. यावरून, अभ्यासाचे महत्त्व दिसून येते की, यामुळे ग्रंथालय व्यवस्थापनामध्ये सर्वोत्कृष्टता दिसून येते आणि त्याच बरोबर ग्रंथालयातील सर्वांना या प्रक्रियेमध्ये सामावून घेता येते. प्रत्येक उपयोजकाचे आपण देत असलेल्या सेवांमधून समाधान करता येते.

- **निष्कर्ष:** -
- चांगल्या ग्रंथालयाचा अंतिम उद्देश म्हणजे प्रत्येक पुस्तकासाठी योग्य वाचक आणि योग्य ठिकाण असणे हा आहे. तर, अंतिम विश्लेषणात, सिक्स सिग्मा महत्त्व, पद्धतशीर, एकात्मिक, सर्वांसमोर येणारे, पुस्तकांची साहित्य व्यवस्था आणि ग्रंथालयातील इतर संबंधित उत्तमोत्तम सर्व गोष्टींच्या समाधानासाठी प्रयत्न करणे हे सहा सिग्माचे उद्दिष्ट नमूद केले आहे. सर्व वेळी ही पद्धत वापरून रोजचे काम सोपे, सोयीस्कर आणि जलद करणे कसे शक्य होते हे सांगितले आहे. बेंचमार्किंगचा वापर करून समस्या विश्लेषण आणि बाह्य-उन्मुख सर्वोत्तम सराव दृश्य हा सहा सिग्मा पद्धतीचा एक नाविन्यपूर्ण वापर करता येतो. DMAIC दृष्टीकोनामुळे कोणत्याही दैनंदिन कामामध्ये लक्ष केंद्रित करून सुधारणा करण्यात आले आहे. कमी कालावधीत दोषांमध्ये सातत्यपूर्ण पायरी कपात केली गेली. तथापि, जर ग्रंथालयाने सर्वतोपरी प्रयत्न केले आणि जुळणारी पायाभूत सुविधा आणि संसाधने विकसित केली तर सिक्स सिग्मा कामगिरी साध्य करणे अशक्य नाही. मुंबईतील डब्बावाल्यांना अन्न वितरणात सहा सिग्मा कामगिरी सुनिश्चित करता आली तर इतर ग्रंथालयांनी अश्या पद्धतीने माहिती आणि कल्पना पोहोचवण्यासाठी सिक्स सिग्मा पातळी गाठण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. वापरकर्त्यांच्या गरजा आणि अपेक्षांचे समाधान होणे गरजेचे आहे. 6σ

मुळे ते शक्य झाले आहे. सर्व कर्मचारी कामाची प्रक्रिया सुधारण्यात गुंतलेले असतात.  सर्व कर्मचारी व्यवस्थापनासाठी समर्पित आणि वचनबद्ध अशी ही पद्धत आहे. ग्रंथालयामध्ये एकसंघ होऊन काम करणे आवश्यक आहे. जेव्हा आपण 6σ वापरतो, तेव्हा समस्या सोडवण्याची क्षमता वाढवली जाते हे या अभ्यासातून समोर आले आहे.

- **संदर्भ**: -


- ॲलन, फर्न सी., (1993), बेंचमार्किंग: माहिती व्यावसायिकांसाठी व्यावहारिक पैलू, विशेष ग्रंथालये. पृ.१२३-१३०.
- अमेरिकन लायब्ररीयन असोसिएशन, (1983), द एएलए ग्लोसरी ऑफ लायब्ररी अँड इन्फॉर्मेशन सायन्स, शिकागो.
- अँटनी, जिजू आणि इतर, (२००७), सेवा संस्थांमध्ये सिक्स सिग्मा: फायदे, आव्हाने आणि अडचणी, सामान्य समज, अनुभवजन्य निरीक्षणे आणि सक्सेस फॅक्टर्स, इंटरनॅशनल जर्नल ऑफ क्वालिटी अँड रिलायबिलिटी मॅनेजमेंट, खंड २४(३), पान नं. २९४-३११.
- अरोरा, आर.एल. आणि लेखी, रेणुका, (१९९८), लायब्ररीतील बदलत्या परिस्थिती आणि व्यवस्थापन, ४४व्या आयएलए कॉन्फरन्सचे पेपर्स, चंदीगड, ५ नोव्हेंबर १९९७, आयएलए: नवी दिल्ली. पृ.१५३-१६१.
- ॲटकिन्सन, फिलिप ई., (१९९३), संस्कृतीत बदल निर्माण करणे: यशस्वी टीक्यूएम (TQM), मद्रास उत्पादकता प्रेस प्रा. लि.
- बसू, कराबी, (२८-३१ डिसेंबर, १९९९), माहिती तंत्रज्ञान व्यवस्थापन; साधने आणि तंत्रे, xxii परिषदेचे पेपर्स, आग्रा, IASLIC, कलकत्ता. पृ.१२५-१२९.
- ब्रॉफी, पीटर, केट, कॉलिंग आणि मॅक्सिन, मेलिंग, (१९९३), गुणवत्ता व्यवस्थापन: एक विद्यापीठ दृष्टीकोन, एएसएलआय माहिती, २१ जून, १९९३. पृ. २४६-२४८.





- ब्रू, ग्रेग आणि हॉवेस, रॉड, (२००६), सिक्स सिग्मा, नवी दिल्ली, टाटा मॅकग्रॉ-हिल.
- देशमुख, सी.डी., (१९५८), भारतातील विद्यापीठ ग्रंथालय प्रणाली, नवी दिल्ली, स्टर्लिंग प्रेस.
- दुबे, योगेंद्र पी., (२ जून २००३), माहिती व्यवस्थापनातील नवीन आव्हाने आणि ई लर्निंग इन द एज ऑफ ग्लोबलायझेशन: इश्यू अँड अपॉर्च्युनिटीज, लायब्ररी हेराल्ड पृ.८१-८९.
- गार्विन, डीए., (१९८७), गुणवत्तेच्या आठ आयामांवर स्पर्धा, हार्वर्ड बिझनेस रिव्ह्यू.
- गिटलो, हॉवर्ड एस. अँड अदर्स, (२००६), ग्रीन बेल्ट्स अँड चॅम्पियन्ससाठी सिक्स सिग्मा डिझाइन., नवी दिल्ली, पीअरसन पब्लिकेशन.
- गिटलो, हॉवर्ड एस., (२००९), सहा सिग्मा व्यवस्थापन कौशल्ये, टेलर आणि फ्रान्सिस गटासाठी मार्गदर्शक. एलएलसी.
- गुड, कार्टर व्ही., (१९७३), डिक्शनरी ऑफ एज्युकेशन, -३ री आवृत्ती, न्यूयॉर्क मॅकग्रा हिल.
- ग्रिफिथ्स, डेव्हिड एन., (१९९५), दर्जेदार वातावरणात व्यवस्थापन, नवी दिल्ली, टाटा मॅकग्रॉ हिल.
- गुप्ता, दिनेश कुमार आणि जैन, एस. एल., (१९९६), नवीन आर्थिक युगातील ग्रंथालय आणि माहिती केंद्रे, एक विहंगावलोकन, हेराल्ड ऑफ लायब्ररी सायन्स,३५(जानेवारी-एप्रिल-१-२).
- झांब, एल.सी., (२००६)., उत्पादन आणि संचालन व्यवस्थापन, पुणे, एव्हरेस्ट प्रकाशन
- झांब, एल.सी., (२००६)., उत्पादन नियोजन आणि नियंत्रण, पुणे, एव्हरेस्ट प्रकाशन. पान १

- जोसेफ अँड बर्क, सुसान, (१९९५), टोटल क्वालिटी मॅनेजमेंट, नवी दिल्ली, एक्सेल बुक प्रकाशन.
- मल्हान, आय. व्ही. आणि राव, शिवराम, (सप्टें'०५), 'लायब्ररीमध्ये सिक्स सिग्माचा वापर', व्यवस्थापकीय माहिती भाग १.

# नॅक मूल्यांकन आणि ग्रंथालयांची भूमिका

**हितेश गोपाळ ब्रिजवासी**

ग्रंथपाल,

के.ए.के.पी संस्थेचे वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, जळगाव

**पार्श्वभूमी :** उच्च शिक्षण देणाऱ्या शैक्षणिक संस्थांना अध्यापन आणि संशोधन कार्यासाठी एक अनुकूल असे वातावरण उपलब्ध करून देणे आवश्यक आहे ज्यातून विद्यार्थीशैक्षणिक संस्थांना चांगल्या .शिक्षक आणि संशोधकांना यांना मदत होईल , सेवा आणि सुविधा उपलब्ध करून देण्यास प्रवृत्त करण्यासाठी देशांतर्गत अनेक आयोग आणि मंडळ हे शालेय स्तरापासून तर विद्यापीठ स्तरापर्यंत कार्यरत आहे . ) National Assessment and Accreditation CouncilNAACव्दारे देखील उच्च ( निमशासकीय संस्थांचे मूल्यांकन करून श्रेणी ,खाजगी ,शिक्षण देणाऱ्या सर्व शासकीय प्रदान करण्ात येते जेणेकरून त्या शैक्षिणक संस्थाव्दारे दिल्या जाणाऱ्या सेवा , या लेखाच्या .सुविधा आणि अध्यापन व संशोधन कार्याची गुणवत्ता आखली जाते माध्यमातूननॅक मूल्यांकन कार्य पद्धती आणि यात असलेली ग्रंथालयांची भूमिका याचा चिकित्सक अभ्यास करण्यात आला आहे .

**शोध संज्ञा** :नॅक मूल्यांकनग्रंथालय पारंपरिक व ,ग्रंथालय वाचन साहित्य संग्रह , .नवपारंपरिक सेवा

**संशोधन पद्धती** :सदर लेख नॅक समितीच्या प्रत्यक्ष भेटी आणि मूल्यांकनाच्या स्वानुभव आणि इतर ग्रंथपालांच्या मुलाखतीतून मिळालेल्या माहितीच्या आधारावर तयार करण्यात आला असून यासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.



**प्रस्तावना :** उच्च शिक्षण संस्था आणि त्यात दिल्या जाणारे शिक्षणसेवा आणि , फक्त शिक्षण सुविधा ह्या उत्तम दर्जाच्या आणि काळानुरूप असल्यास त्याचा फायदा घेत असलेल्या विद्यार्थ्यांनाच होतो असे नाही यातून चांगले संशोधन निर्माण करता येते , ,सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात योगदान देता येते ,रोजगार निर्मिती करता येते शासनाच्या योजनांची ,समाजातील विविध समस्यांचे निराकरण करता येते उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांची अशा विविध जवाबदारी .अंमबजावणी करता येते लक्षात घेवूननॅक मूल्यांकनात अध्ययनकौशल्य आधारित ,संशोधन ,अध्यापन- रोजगार निर्मिती ,सामाजिक उपक्रम ,व्यक्तिमत्व आणि कौशल्य विकास ,उपक्रम विविध संस्थांचे सामंजस्य करार अशा विविध पैलूंना उजाळा देण्यात आला ,उपक्रम एकंदरीत फक्त शिक्षण घेणारे विद्यार्थी न घडवता अशी पिढ .आहेी घडवावी ज्यातून एक जबाबदार व्यक्ती घडविण्यास मदत होईल अशा शैक्षणिक संस्था निर्माण झाल्या पाहिजे असे उद्देश देखील नॅक मूल्यांकन करतांना तपासले जाता .नॅक मूल्यांकन पद्धतीत शैक्षणिक क्षेत्रातील विविध आयाम आणि त्यांची कार्ये तपासली जातात त्यात एक मुख्य आयाम हा शैक्षणिक संस्थेचे ग्रंथालय देखील आहेतथापि ग्रंथालय हे . .आधीपासूनच शिक्षणाचा आधारस्तंभ किंवा केंद्रबिंदू राहिले आहेनॅक मूल्यांकन असो वा शैक्षणिक संस्थांची गुणवत्ता या दोन्ही साठी परिपूर्ण ग्रंथालय असणे आवश्यक आहेपरिपूर्ण ग्रंथालय हा शब्द कदाचित कठीण आ .हे परंतु याची आवश्यकता आहे . माहिती .दिवसेंदिवस सर्व क्षेत्रात प्रगती होत आहे .या संपूर्ण लेखात याची प्रचिती दिसते आणि तंत्रज्ञानाच्या युगात तर प्रगतीचा हा वेग फारच वाढलेला दिसतो आणि याचा ग्रंथालये आता आपल्याला आध .परिणाम ग्रंथालय क्षेत्रात देखील दिसून येतोुनिक स्वरूपात बदलल्याचे दिसून येतेप्राचीन काळात अस्तित्वात आलेली ग्रंथालये आता . त्यांच्या निर्मितीच्या चौथ्या पिढीत बदलल्याचे दिसून येते ग्रंथालयांची पहिली पिढी अशी

प्रणांच्या ,यात हस्तलिखिते .होती ज्यात मुद्रित वाचन साहित्यांचा अभाव होता ,सालीवरील लिखाणशिलालेखधांतुंवर कोरलेले लिखाण अशा वाचन साहित्यांचा , समावेश होता व अशी ग्रंथालये सर्वांसाठी उपलब्ध नव्हती राजे महाराजे किंवा महालात किंवा धार्मिक स्थळात अशा ,समाजातील प्रतिष्ठित व्यक्तीच्या घरात ,कालांतराने कागदाचा शोध .ग्रंथालयांची निर्मिती केली जात होतीशाईचा शोध , छपाईचा शोध आणि मुद्रण कलेचा शोध लागला आणि मोठ्या संख्येत ग्रंथ किंवा ,वाचन साहित्यांची निर्मिती करता येणे शक्य झाले आणि समाजात सार्वजनिक आणि समाजात ग्रंथालयांची .शैक्षणिक ग्रंथालयांचे मोठे जाळे निर्माण होऊ लागले आवश्यकता निर्माण होऊ लागले काळानुरूप माहिती तंत्रज्ञानाचा शोध लागला आणि ग्रंथालयांच्या साहित्यांमध्ये देखील माहिती आणि तंत्रज्ञानाचा अंतर्भाव झाला आता ग्रंथालयातील वाचन साहित्य हे देखील आधुनिक स्वरूपाचे होऊ लागले आणि आज जे टप्प्यात आपण उभे आहोत त्या ठिकाणी फक्त वाचन साहित्यच नाही तर ग्रंथालयांच्या सुविधा देखील या आधुनिक स्वरूपाच्या झाल्या आहेत आणि नॅक मूल्यांकनात ह्याच गोष्टींचा अंतर्भाव मोठ्या प्रमाणात दिसून येतोकशा पद्धतीच्या सेवा . ग्रंथालयांचे वाचन साहित्य समृद्ध ,आणि सुविधा ग्रंथालय मार्फत दिल्या जाव्या करताना कोणकोणत्या निकषांचा अवलंब केला जावाकशा पद्धतीने ग्रंथालयीन , ग्रंथालयीन व्यवहाराची नोंद कशा पद्धतीने संग्रहित ,कार्यपद्धतीची व्यवस्थापन असावे केले जावी अशा अनेक घटकांवरनॅक मूल्यांकनात मोठ्या प्रमाणात भर दिले गेल्याचे जाणवते तर जाणून घेऊया .नॅक मूल्यांकनात ग्रंथालयांचे योगदान सविस्तर रित्या जाणून घेऊ त्या अगोदर थोडक्यात देखील समजून घेवूया.

**राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रमाणन परिषद )नॅक:** ( ही संस्था उच्च शिक्षण संस्थांचे मूल्यांकन आणि मान्यता देण्यासाठी स्थापन करण्यात आली आहे .नॅक ची स्थापना 1994 मध्ये झाली होती आणि तिचे मुख्यालय बंगलोर.कर्नाटक येथे आहे , नॅक च्या मूल्यांकन प्रक्रियेत शैक्षणिक संस्थांची कामगिरी, अभ्यासक्रमाची निवड आणि



अंमलबजावणी, शैक्षणिक दर्जा आणि मूल्यमापन, विद्यार्थ्यांचे निकाल, संशोधन कार्य, मूलभूत सुविधा आणि संसाधनांची स्थिती, संस्था प्रशासन, आर्थिक स्थिती आणि विद्यार्थी सेवा यांचा समावेश होतो.

**नॅक विविध शैक्षणिक संस्थांचे मूल्यांकन आठ श्रेणींमध्ये करते:**

3++अ :00.4 – 51.

3+अ :50.3 – 26.

3अ :25.3 – 01.

2++ब :00.3 – 76.

2+ब :75.2 – 51.

2ब :50.2 – 01.

1क :00.2 – 51.

≤ 1.50: ड

**नॅक च्या मूल्यांकन प्रक्रियेत खालील महत्वपूर्ण गुण समाविष्ट होतात:** **शैक्षणिक गुणवत्ता :**अभ्यासक्रमाची रचनाआणि विद्यार्थ्यांच्या ,अध्यापन पद्धती , .शैक्षणिक प्रगतीचे मूल्यमापन संशोधन आणि नवोपक्रम ,प्रकाशने ,संशोधन कार्य : .आणि नवोपक्रमाच्या उपक्रमांची स्थिती विद्यार्थी समर्थन आणि प्रगतीविद्यार्थ् :यांच्या सेवांची गुणवत्ता.आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे मूल्यमापन ,करिअर मार्गदर्शन , मूलभूत सुविधाआणि इतर शैक्षणिक संसाधनांची ,क्रीडा सुविधा ,प्रयोगशाळा ,ग्रंथालय : .उपलब्धता संस्था प्रशासनआणि ,आर्थिक व्यवस्थापन ,प्रशासनाची कार्यक्षमता :

संस्थेच्या धोरणांची अंमलबजावणी. सामाजिक जबाबदारीपर्यावरणीय ,समाजसेवा : .आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव ,उपक्रम हे गुण संस्थेच्या सर्वांगीण विकासासाठी आणि गुणवत्ता सुधारण्यासाठी महत्वाचे आहेत.

नॅक च्या मूल्यांकन प्रक्रियेत ग्रंथालये महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. ग्रंथालये शैक्षणिक संस्थांच्या शैक्षणिक गुणवत्ता आणि संशोधन क्षमतेचे प्रतिबिंब असतात. नॅक च्या मूल्यांकनात ग्रंथालयांच्या खालील बाबींचा विचार केला जातो:

**संसाधनांची उपलब्धता:** नॅक मूल्यांकनाच्या दृष्टिकोनातून सर्वात महत्वाची आणि पहिली बाब म्हणजे ग्रंथालयात असलेल्या वाचन साहित्यांची उपलब्धता यात मुद्रित आणि अमुद्रित स्वरूपातील असलेले क्रमिक पुस्तके ,दुर्मिळ पुस्तके ,संदर्भ पुस्तके , आणि इतर शैक्षणिक ,रिसोर्सेस-नियतकालिके इत्यादींचा समावेश होतो तसेच ई वाचन साहित्यांची योग्य पद्धतीने व .तपासली जाते सामग्रीची उपलब्धता आवश्यकतेनुसार मागणी तसेच त्यांचे योग्य संग्रहणजतन आणि व्यवस्थापन केलेलं , ,ओपॅक) तलिकिकरण ,साहित्यांचे वर्गीकरण .आहे की नाही हे तपासले जाते वेब ओपॅक ,(एम ओपॅक ,लेबलिंग .सूची आदींचा देखील यात सामवेश होतो ,

**सुविधा आणि सेवा:** ग्रंथालयांव्दारे वाचकांना दिल्या जाणाऱ्या सुविधा या वाचकाभिमुख आहेत की नाही त्यांचा खरा उपयोग वाचकांना होत आहे की नाही हे देखील नॅक मूल्यांकनाच्या महत्वाच्या बाबी पैकी एक बाब आहे.

- वाचकांसाठी वाचन कक्षाची उपलब्धता त्यात आवश्यक संख्येनुसार बैठकीची उपलब्धता वाचन साहित्य आणि इंटरनेट सुविधा उपलब्ध आहे का हे तपासले जाते. वाचकांच्या वापराच्या नोंदी असणे देखील अनिवार्य आहे. वाचन कक्षात



जास्त वेळ बसावे लागते या अनुषंगाने वाचन कक्षात किंवा कक्षाला लागूनच भौतिक सुविधा असणे गरजेचे आहे.

- इंटरनेट सेवा : विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने माहितीचा शोध घेता येईल यासाठी ग्रंथालयात इंटरनेट सुविधा असणे देखील अनिवार्य आहे.
- ग्रंथालय व्यवस्थापन प्रणाली : ग्रंथालयातील कार्यात अचूकता यावी आणि ग्रंथालयीन कर्मचारी आणि वाचकांचा वेळ वाचावा यासाठी ग्रंथालय व्यवस्थापन प्रणाली असणे अनिवार्य आहे याच्या मदतीने ग्रंथांची मागणी, उपार्जन आणि सोपस्कार प्रकिया सोपी होते. तसेच ग्रंथांचे देवघेव, सभासद नोंदणी, ग्रंथ नोंदणी, ग्रंथ शोध, नियतकालिक व्यवस्थापन, केलेल्या व्यवहारांची नोंद, दंड आकारणी, बारकोडींग, तालिकीकरण, वर्गीकरण, खर्च अहवाल, अंदाजपत्रक आदी कामांना गती येते.
- वाचक सेवा : या अंतर्गत ग्रंथालयांद्वारे वाचकांना दिल्या जाणाऱ्या विविध सेवांचा समावेश होतो. उदा. संदर्भ सेवा, माहिती सेवा, रेफरल सेवा, प्रचलित जागृत सेवा अशा विविध कार्यांचा समावेश होतो. यासाठी ग्रंथालयांनी पूर्वलक्षी नियोजन करून ग्रंथालयांमध्ये विविध ठिकाणी आवश्यकतेनुसार सेवा दालने निर्माण करावी यामध्ये पुस्तके शोधण्यासाठी आज्ञावलीच्या साह्याने ओपॅक सुविधा, नव्याने आलेल्या ग्रंथ साहित्यांचे डिस्प्ले, नियतकालिकांची सूची तसेच त्यांच्यात आलेल्या लेखांच्या नोंदी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. ग्रंथालयांच्या विविध सुविधांची माहिती देणारे फलक देखील ग्रंथालयात उपलब्ध करून देणे महत्त्वाचे आहे. नवीन वाचकांसाठी वाचक परिचय उपक्रम, ग्रंथालय माहिती पुस्तिका असणे देखील महत्वाचे आहे. जेणेकरून वाचकांना ग्रंथालय बद्दलची संपूर्ण माहिती प्राप्त होते.

- ऑनलाईन संसाधनांची उपलब्धता : हाताचा वाचक हा ग्रंथालयात येवून वाचन साहित्य हातळण्यापेक्षा ऑनलाइन पद्धतीने माहिती शोधण्यावर जास्त भर देतो परिणामी ग्रंथालयांना ऑनलाइन पद्धतीने देखील वाचकांना सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे यासाठी विविध ई-संसाधनांचे सदस्यत्व, मोफत आणि दर्जेदार ही संशोधनांची उपलब्धता करून देणे गरजेचे आहे यात प्रामुख्याने इन्फ्लिबनेट द्वारे उपलब्ध करून दिलेले Nlist, Delnet, E-Shodhsindhu, National Digital Library, NPTEL, E-PG Pathshala, Shodh Ganga, Shodh Gangotri, Swayam अशा दर्जेदार ई-संसाधनांची उपलब्धता असणे अनिवार्य आहे.

- ऑनलाइन वाचन कक्ष : पारंपरिक वाचन साहित्य हाताळण्यासाठी ज्या पद्धतीने वाचन कक्षाची आवश्यकता असते त्याच पद्धतीने ई-संसाधनांची हाताळणी करण्यासाठी ग्रंथालयांमध्ये ऑनलाईन वाचन कक्षांची देखील उपलब्धता असणे अनिवार्य झाले आहे. या ऑनलाईन कक्षामध्ये संगणकांची उपलब्धता तसेच त्यांना इंटरनेटची जोड देणे महत्त्वाचे आहे. तसेच विद्यार्थ्यांना ई-संसाधने हाताळण्यास सोयीचे जावे म्हणून हेडफोन आणि स्पीकर उपलब्ध असावे.

**संचालन आणि व्यवस्थापन:** ग्रंथालय सेवेची गुणवत्ता ही ज्याप्रमाणे त्यात असल्येल्या संसाधनांवर निर्भर असते त्याचप्रमाणे ग्रंथालयाचे संचालन आणि व्यवस्थापन हे देखील महत्वाचे आहेउपलब्ध ग्रंथ साहित्यांची सुयोग्य पद्धतीने . उपलब्धता करून देणे तसेच आलेल्या वाचकांच्या माहितीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आहेत यात कुशल मानव संसाधन हा घटक महत्त्वाचा योग्य ग्रंथालय संचालन गरजेचे ठरतोग्रंथालय ही सेवा देणारी संस्था असल्यामुळे येणाऱ्या वाचकांना योग्य पद्धतीने . माहिती उपलब्ध करून देण्यासाठी कर्मचाऱ्यांची वाचकांप्रती असलेले आचरण



ग्रंथालयात आलेल्या वाचकाला नेमके कोणते वाचन साहित्य हवे आहे .महत्त्वाचे ठरते किंवा नेमकी कोणती माहिती हवी आहे व ती त्याला कशी उपलब्ध होईल याची व्यवस्थित माहिती दिली जाणे महत्त्वाचे आहेत व यासाठी योग्य व्यवस्थापन ग्रंथालयात निर्माण करणे गरजेचे आहेग्रंथालयाचे वेडे ,वाचकांना ग्रंथालयाची नियमावली .उदा . ग्रं ,वाचन साहित्य देवघेव पद्धती बद्दल माहिती ,संदर्भातील माहितीथालय रचने बद्दलची माहितीआवश्यक त्या ठिकाणी ,विविध विभागात योग्य व्यक्तीची नियुक्ती , कमीत कमी वेळेत योग्य पद्धतीने ग्रंथालयाचा वापर ,माहिती तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर यासाठी वेळोवेळी .करता यावा यासाठीचे नियोजन ग्रंथालयात असणे आवश्यक आहे ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांना देखील प्रशिक्षण दिले जाणे महत्त्वाचे आहे तसेच विविध नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर ग्रंथालयात करणे गरजेचे आहे .

**उपयोग आणि प्रवेश:** ग्रंथालयात उपलब्ध असलेले वाचन साहित्य उपलब्ध असलेल्या सेवा आणि सुविधा यांचा पूर्ण निकष हा त्यांचा होणाऱ्या वापरावर अवलंबून असतो नॅक मूल्यांकनात ग्रंथालयीन सेवा सुविधांचा तसेच वाचन साहित्यांचा वापर याची नोंद तपासले जाते किंबहुना ग्रंथालयांचा वापरावर .नॅक मूल्यांकनात विशेष लक्ष दिले गेले आहे यासाठी शिक्षक व विद्यार्थ्यांच्या देव घेव-यामुळे ग्र .प्रक्रियेच्या नोंदी तपासल्या जातातंथालयातील दैनंदिन अहवालाचे नोंदणी सुव्यवस्थेत करणे महत्त्वाचे आहे अशा नोंदणी संगणक आधारित असल्यास विशेष महत्व दिले जातेग्रंथालयात ,ग्रंथालयात दरवर्षी खरेदी केले जाणारे वाचन साहित्य . घेव प्रक्रियेचे नोंद तसेच ग्रंथालयात दररोज य-वर्षभर वाचकांनी केलेल्या देवेणाऱ्या वाचकांची संख्या यात सर्वांची आकडेवारी महत्त्वाची ठरते .ग्रंथालय समाजातील इतर वाचकांना देखील सेवा प्रदान करते का ? जर करत असेल तर ही बाब ग्रंथालय सेवेसाठी जमेची बाजू ठरू शकते आणि मूल्यांकनात विशेष महत्व प्रदान करू शकते. तसेच ग्रंथ भेट किंवा दान स्वरूपात प्राप्त झाले असतील त्याचाही उल्लेख आणि नोंद असणे अनिवार्य ठरते.

**नवोपक्रम आणि तंत्रज्ञान:** तंत्रज्ञानात होणाऱ्या सततच्या बदलामुळे ग्रंथालयात देखील नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर तसेच नवीन तंत्रज्ञानावर आधारित न उपक्रमांचा समावेश करणे आवश्यक आहे यामध्ये डिजिटल डिपॉझिटरी ,लायब्ररी पोर्टल , बुक्स अभ्यासक्रम इत्यादी आधुनिक नवउपक्रमांचा ,ऑनलाइन डेटाबेस निर्मिती यापुढे जाऊन ग्रंथालयात .समावेश ग्रंथालयांच्या कार्यपद्धतीत असणे अनिवार्य झाले आता आर्टिफिशियल इंटेलिजन्स द्वारे सेवा उपलब्ध करून देणे गरजेचे झाले आहेत याचे माध्यमाने वाचकांना अति जलद गतीने सेवा उपलब्ध करून देणे शक्य होते . युजर ट्रेकिंग ,ग्रंथालयात वापरल्या जाणाऱ्या नव उपक्रमात क्यूआर कोड चा वापर डी .आय.एफ.आर ,बारकोड रीडर ,किऑक्स मशीन ,बुक ड्रॉप बॉक्स ,सिस्टीम आर्टिफ ,मोबाईल ओपॅक ,मोबाईल ॲप्लिकेशन ,टेक्नॉलॉजीिशल इंटेलिजन्स टूल्स , अशा आधुनिक तंत्रज्ञानाची (सध्या प्राथमिक स्तरावर कार्यरत आहे) रोबोटिक्स सुविधा जोड ग्रंथालयांना प्राप्त झाली आहे. आधुनिकतेच प्रमाणे पारंपारिकतेवर देखील नॅक मूल्यांकनांचा भर आहे यामध्ये ग्रंथ नोंद वहीचे सुयोग्य लिखाणग्रंथांची स्थिती , आणि बायडिंग सुविधेची उपलब्धता ,बाउंड वॉल्यूमची निर्मिती ,नियतकालिक व्यवस्थापन , .दुर्मिळ ग्रंथांचे संग्रहण आणि जतन या सर्व बाबींचा समावेश केला जातो

**निष्कर्ष** : उच्च शिक्षण संस्थेच्या मूल्यांकनासाठी नॅक ही सर्वोच्च समिती असून या समितीच्या मूल्यांकनात ग्रंथालयांना देखील विशेष महत्त्व दिले गेले आहे आणि या मूल्यांकनात ग्रंथालयांना आपले अस्तित्व निर्माण करायचे असेल तसेच मूल्यांकनाच्या श्रेणीमध्ये सुधारणा करायची असेल तर पारंपरिक ते प्रमाणेच आधुनिक सेवा सुविधांवर ग्रंथालयांनी भर देणे आवश्यक आहे तसेच ग्रंथालयांचे व्यवस्थापन आणि वाचकांचे समाधान या सर्वांमधील कार्य हे सुव्यवस्थेत पद्धतीने पार पाडणे महत्त्वाचे ठरते .नॅक मूल्यांकनामुळे ज्या पद्धतीने महाविद्यालयाचे किंवा उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थेचे नावलौकिक वाढते त्याचप्रमाणे मूल्यांकन प्रक्रियेत जर ग्रंथालयांनी आपले योगदान दिले तर ग्रंथालयांची आणि ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांची देखील नावलौकिक वाढले जाऊ शकते म्हणून मूल्यांकनात सामोरे जाताना ग्रंथालयांनी वरील सर्व घटकांचा समावेश आपल्या कार्यपद्धती केला पाहिजे.



1. विश्लेषण : 'नॅक' म्हणजे काय? 'नॅक' मूल्यांकन प्रक्रिया कशी असते ? जाणून घ्या सविस्तर |What is NAAC how Assessment process done know detail information in marathi (loksatta.com)
2. Who will Evaluate : NAAC Article National Assessment and Accreditation Council, 'नॅक' चे मुल्यांकन कोण करणार? - who will evaluate the NAAC is article written by vilas patane - Maharashtra Times (indiatimes.com)
3.GUIDELINES OF QUALITY INDICATORS IN LIBRARY AND INFORMATION SERVICES UNIVERSITIES/AUTONOMOUS COLLEGES (NAAC.gov.in)
4. (PDF) BEST PRACTICES IN ACADEMIC LIBRARIES: WITH SPECIAL REFERENCE TO NAAC ACCREDITATION (researchgate.net)
5. Jange, Suresh (2021), NAAC ACCREDITATION AND ACADEMIC LIBRARIES :LIBRARIANS' ROLE BEYOND LIBRARIANSHIP; JOURNAL OF INDIAN LIBRARY ASSOCIATION, , VOL. ५७ (४).